PARLE MAHOTSAV
Organiser - ADV. PARAG ALAVANI, MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

**कृपया प्रसिद्धिसाठी**

# पार्ले महोत्सवाने अठरा वर्षात निर्माण केला भव्य परिवार - खा. रावसाहेब दानवे पाटील

मुंबई दि. २३ : गेली १८ वर्षे पार्ले महोत्सव बहरत असून पहिल्या वर्षापासून महोत्सवात सहभागी झालेले स्पर्धक, पंच - परिक्षक व कार्यकर्ते हे अठराव्या वर्षीही जोडलेले असून पार्ले महोत्सव हा एक मोठा परिवार झाला आहे असे गौरवोद्गार भाजपा प्रदेश अध्यक्ष खासदार रावसाहेब दानवे पाटील यांनी काढले. ते १८ व्या पार्ले महोत्सवात उद्घाटन प्रसंगी बोलत होते. आपण स्वतः स्पर्धक, प्रेक्षक या नात्याने अनेक स्पर्धांमध्ये आनंद घेतला असल्याने या भव्य महोत्सवामध्ये उद्घाटक या नात्याने येण्यास विशेष आनंद होत आहे. पार्ले महोत्सवासारखा मोठा उपक्रम सातत्याने १८ व्या वर्षे राबवून एक परिवार उभार केल्याबद्दल आमदार पराग अळवणी यांचे त्यांनी अभिनंदन केले. स्पर्धकांनी विजयी झाल्यास न झाल्यास नाउमेद न होता पुढील स्पर्धेसाठी तयारी केल्यास यश नक्की मिळेल असा सल्लाही याप्रसंगी उपस्थितांना त्यांनी दिला.

युवकांसाठी पार्ले महोत्सव हे युवकांमधील कलागुणांना वाव देणारे हे एक महत्वाचे व्यासपीठ असून त्यांचा लाभ सर्व तरुणांनी घ्यावा असे उद्गार भाजपा युवा मोर्चाच्या राष्ट्रीय अध्यक्षा खासदार पूनम महाजन यांनी काढले. तसेच महोत्सव यशस्वी करणाऱ्या शेकडो युवा कार्यकर्त्यांचेही त्यांनी अभिनंदन केले.

१८ व्या पार्ले महोत्सवाच्या पहिल्या दिवशी वॉलीबॉल, कबड्डी, बॉक्स क्रिकेट तसेच प्रथमच होत असलेल्या सेफ ड्रायव्हींग स्पर्धेमध्ये सुमारे साडेतीन हजार स्पर्धकांनी भाग घेतला आणि पहिल्याच दिवशी कबड्डीचे सुमारे ७८ सामने, बॉक्स क्रिकेटचे ३० सामने तर वॉलीबॉलचे ४० सामने खेळवले गेले. वॉलीबॉल शाळा गटातील स्पर्धेत मुलांच्या १२ तर मुलींच्या १२ संघांनी भाग घेतला तर गृहनिर्माण संस्थांच्या मुल व मुली दोघांचा समावेश असलेल्या १३ संघांनी भाग घेतला. या संघांना प्रोत्साहन देण्यासाठी पालक व मित्र मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यंदा महोत्सवातील कबड्डी स्पर्धा ही पश्चिम  उपनगर जिल्हा कबड्डी असोसिएशन ''ब'' गट ही अजिंक्य स्पर्धा असल्याने विशेष महत्व प्राप्त झाले आहे. या अव्वल स्पर्धकांच्या सहभागामुळे क्रिडा रसिकांनी वामन मंगेश दुभाषी मैदानात प्रचंड गर्दी केली होती.